ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८८ वा | दिनांक : ३१/१२/२०२४ | वार : मंगळवार

## नीतेश राणेंनी सर्वच मर्यादा ओलांडल्या : बाळासाहेब थोरात



**मुंबई** : भाजप नेते व मंत्री नीतेश राणे यांनी सासवड येथे बोलताना केरळ हे मिनी पाकिस्तान असल्याचे वादग्रस्त विधान केले होते. यावर आता कॉंग्रेस नेत्यांनी त्यांच्यावर टीका करण्यास सुरू केले आहे. मंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिकरित्या बोलताना, वागताना भान बाळगले पाहिजे पण नीतेश राणे यांनी मर्यादा ओलांडल्या असल्याची टीका बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

बाळासाहेब थोरात म्हणाले, केरळ सारख्या राज्याला मिनी पाकिस्तान म्हणणे, राहुल आणि प्रियांका गांधी यांना मतदान करणारे दहशतवादी असे हिणवणे हे उद्योग फक्त भाजपचे मंत्री करू शकतात! काही सकारात्मक करू शकत नसले की भाजप नेते हिंदू मुस्लिम, भारत पाकिस्तान हाच अजेंडा राबवतात. पण मंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीने सार्वजनिक रित्या बोलताना, वागताना भान बाळगले पाहिजे पण नितेश राणे यांनी सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत, असे त्यांनी ट्विट करत टीका केली आहे.

पुढे बाळासाहेब थोरात म्हणतात, जितकी जास्त बाष्कळ बडबड तितकी जास्त प्रगती हे समीकरण भाजपमध्ये असल्याने मंत्री महोदयांनी पुन्हा एकदा तारे तोडले आहेत. पण मुख्यमंत्र्यांनी किमान आपल्या सहकाऱ्याला समजूत द्यावी, ही भाषा, हे वर्तन योग्य नाही, मंत्र्यांनी आपल्या पदाचे ग्रहण करताना शपथ घेतली आहे याची तरी आठवण ठेवावी आणि समाजात तेढ वाढणार नाही असे वर्तन करू नये, असे देखील बाळासाहेब थोरात यांनी म्हंटले आहे.

भाजप नेते व मंत्री नीतेश राणे यांच्या विधानावर कॉंग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. वर्षा गायकवाड म्हणाल्या, नीतेश राणे यांनी केरळची पाकिस्तानशी केलेली तुलना आणि तिथल्या लोकांना दहशतवाद्यांशी जोडून केलेले विधान हे अत्यंत अपमानास्पद आणि संतापजनक आहे. असे बेछूट वक्तव्य म्हणजे संविधानातील सिद्धांतांवर थेट हल्ला आहे. हा त्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्या पदाच्या तत्वांशी केलेला विश्वासघात आहे. भाजपने उत्तर द्यावे, नीतेश राणे यांच्या द्वेषपूर्ण वक्तव्याचे ते समर्थन करतात का? या असंविधानिक वक्तव्यांसाठी मंत्र्यांचा राजीनामा घेतला पाहिजे, असे म्हणत वर्षा गायकवाड यांनी नीतेश राणे यांच्या मंत्रीपदाच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

सासवड येथे बोलताना मंत्री नीतेश राणे म्हणाले, केरळ हे राज्य मिनी पाकिस्तान आहे. म्हणूनच राहुल गांधी आणि त्यांची बहीण तेथून निवडून येतात. सगळे अतिरेकीच त्यांना मतदान करत आहेत. मी खरे बोलतोय. अतिरेकींना हाताशी धरूनच हे लोक खासदार झालेले आहेत, असे विधान त्यांनी केले होते.

## धनंजय मुंडे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या भेटीला

**मुंबई** : बीडच्या मस्साजोग प्रकरणामुळे अडचणीत सापडलेले राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी पोहोचलेत. या दोन्ही नेत्यांत काही वेळ चर्चा झाल्याची माहिती आहे. या चर्चेचा तपशील अद्याप बाहेर आला नाही, पण दोन्ही नेत्यांत संतोष देशमुख हत्याकांड व त्यासंबंधी होणाऱ्या कारवाईवर चर्चा झाल्याचा दावा केला जात आहे.

बीडच्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे अवघा महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचे नाव आल्यामुळेया प्रकरणाची संवेदनशीलता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला पोहोचलेत.




## महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकांनंतर योजना बंद होणार : विनायक राऊत

**मुंबई** : लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात नुकताच डिसेंबर महिन्याचा हप्ता जमा झाला आहे. परंतु, ही योजना लवकरच बंद होणार असल्याचा दावा माजी खासदार आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ही योजना चर्चेत आली आहे.

लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीसाठी जुमला असून ती लवकरच बंद होणार असा दावा विरोधकांकडून करण्यात येत होता. निवडणुकीनंतर ही योजना बंद होणार, असेही विरोधक म्हणत होते. तर आम्ही सुरू केलेली कोणतीही योजना बंद होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनात दिली होती. त्यानंतर लाभार्थ्यांच्या खात्यात डिसेंबरचा हप्ता देखील जमा होत आहे. मात्र, ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार विनायक राऊत यांनी ही योजना बंद होणार असल्याचा दावा केल्यामुळे पुन्हा एकदा चर्चेला पेव फुटले आहे.

महाराष्ट्र कर्जामध्ये डुबलेला आहे, त्यामुळे भविष्यात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सांभाळण्याचे आव्हान अजित दादा कसे पेलणार याबाबत प्रश्नचिन्हे आहे, असे विधान विनायक राऊत यांनी केले आहे. महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकींपर्यंत लाडकी बहीण योजनेचा प्रयोग ते नक्की करतील.

त्यानंतर ही योजना बंद पाडतील, असा दावा राऊत यांनी केला. या योजनेचा डोलारा सांभाळणे जिकरीचे काम असल्याचेही ते म्हणाले. महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका संपल्यानंतर ही योजना बंद करण्यात येणार असल्याचे विनायक राऊत म्हणाले.

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ डिसेंबर २०२४

# कन्नड न्यायमंदिर नूतन इमारत लवकरच जनतेच्या सेवेत - ॲड. कृष्णा पाटील जाधव






**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड न्यायालयाची नूतन इमारत लवकरच जनतेला न्यायदान करण्या साठी तयार होत आहे. सदरील इमारत ही तळमजल्यासह वरील तीन मजले अशी अद्यावत सर्व सुविधांसह कन्नड तालुक्यातील पक्षकारांच्या सेवेत उपलब्ध होत आहे. अशी माहिती कन्नड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पाटील जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

दि. २९ मार्च २०२४ रोजी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबादचे मुख्य न्यायमूर्ती रविंद्रजी घुगे यांचे शुभ हस्ते व सहन्यायमूर्ती श्री. देशमुख यांचे उपस्थितीत नूतन इमारतीचे शिलापूजन करण्यात आले होते, गेल्या आठ महिन्यापासून रात्रंदिवस या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. कन्नड न्यायालयाच्या जुने इमारतीच्या पाच एकर विस्तीर्ण परिसरात नूतन इमारतीचे बांधकाम होणार असून तळमजला व त्यावर तीन मजले असे एकूण चार मजल्याचे बांधकाम होणार असून तळमजल्यावर पार्किंगची व्यवस्था, पक्षकारांचे वाहनाची स्वतंत्र पार्किंग, वकिलांचे वाहनांची स्वतंत्र पार्किंग, तसेच न्यायाधीश यांच्या वाहनाची स्वतंत्र पार्किंग तसेच न्यायाधीश महोदयांच्या जाण्या येण्यासाठी स्वतंत्र लिफ्ट ची सुविधा करण्यात आलेली आहे.

पहिल्या मजल्यावर पुरुष वकील संघ व महिला वकील संघ तसेच स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था, त्याचप्रमाणे मीटिंग हॉल तसेच साक्षीदारांसाठी बैठक व्यवस्था इत्यादीची सुद्धा व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रस्तावित इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर कोर्ट हॉल, प्रशासकीय हॉल, लोक अदालत हॉल, संगणक रूम, न्यायाधीश यांचे चेंबर्स, रेकॉर्ड रूम आणि ग्रंथालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तसेच प्रस्तावित इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर कोर्ट हॉल, न्यायाधीश चेंबर, रेकॉर्ड रूम, साक्षीदारांसाठी बैठक व्यवस्था, मेडिटेशन रूम इत्यादीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर कामावर सुमारे २०० मजूर रात्रंदिवस काम करीत आहे. आजमितीस तळ मजला व पहिल्या मजल्याचे स्लॅब चे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या मजल्याचे काम प्रगतीपथावर आहे.

न्यायालय इमारतीसाठी कन्नड वकील संघाच्या वतीने अनेक दिवसापासून पाठपुरावा व प्रयत्न करण्यात आले होते. या संदर्भात उच्च न्यायालय मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापूर वाला तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा चे प्रतिनिधी ॲड. वसंतराव साळुंखे यांचे विशेष प्रयत्नाने ही इमारत मंजूर झाली असून त्यासाठी श्री गंगापूरवाला यांनी मंत्रालयातील संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता या सर्वांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मीटिंग आयोजित करून त्या सर्वांना आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन करून या न्यायालयाची प्रस्तावित इमारत तात्काळ मंजूर करण्यासंबंधी आदेशित केले होते.

ही इमारतीसाठी ४७ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. एन. के. कन्स्ट्रक्शनस या कंपनीस कामाचे कंत्राट देण्यात आले असून सदर कंपनीचे प्रोजेक्ट ईंजिनियर श्री.अन्सारी हे कामाची देखरेख करत असून या कामावर सार्वजनिक बांधकाम खात्याचे कन्नडचे अभियंता प्रवीण हिवाळे तसेच डेप्युटी इंजिनिअर श्री. येरणे हे करीत असून यापूर्वी कन्नड न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पी. एम. कोळसे व आताचे न्यायमूर्ती वि. द. पाटील तसेच कन्नड वकील संघाचे सर्व सन्माननीय सदस्य वारंवार व वेळोवेळी भेट देऊन कामाची पाहणी करीत असून सदरील काम योग्य पद्धतीने व अत्यंत दर्जेदारपणे व्हावे, यासाठी पूर्ण दक्षतेने काळजी घेत आहेत. सदरील इमारतीच्या बांधकामाचा कालावधी हा दोन वर्षांचा असून सदरील इमारत २०२६ जनतेच्या न्यायदानासाठी तयार होऊन उपलब्ध राहील, अशी माहिती कन्नड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जाधव यांनी दिली.




# मनपा राबविणार गुणवत्ता वाढीसाठी पंचसूत्री कार्यक्रम

### प्रियदर्शनी व मुकुंदवाडी केंद्रात एक जानेवारीपासून जर्मन भाषा शिकवण्यास सुरुवात...

**छत्रपती संभाजीनगर :** मनपाच्या प्रियदर्शनी शाळेत गुणवत्ता वाढीसाठी पंचसूत्री कार्यक्रमाची शिक्षक परिषद मा.आयुक्त जी श्रीकांत साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या पंचसूत्री कार्यक्रमाच्या अंमलबजावणी साठी आज महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय प्रियदर्शनी येथे प्रियदर्शनी व मुकुंदवाडी केंद्राच्या मुख्याध्यापक, शिक्षक, सीबीएसई माध्यमांचे शिक्षक, तासिका शिक्षक व बालवाडी शिक्षिका यांची शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुख्याध्यापक संजीव सोनार, प्रमुख पाहुणे के बी चौधरी, मुख्याध्यापक मुकुंदवाडी तसेच सावित्री कंट्रोल रूम च्या भीमा हिवराळे व तबस्सुम शेख .....उपस्थित होत्या. दोन्ही केंद्राच्या अंतर्गत शाळेचे सर्व मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, सिबीएसई शाळेचे सर्व शिक्षक, तासिका शिक्षक व बालवाडी शिक्षिका यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय मुख्याध्यापक संजीव सोनार सर यांनी केले.गुणवत्ता वाढीसाठी पंचसूत्री कार्यक्रम कसा राबवावा याचे सादरीकरण शशिकांत उबाळे यांनी केले. सर्व शिक्षकांनी मनपा शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करू तसेच इंग्रजीबरोबर जर्मन व फ्रेंच भाषा स्वतः शिकू व विद्यार्थ्यांनाही या भाषा शिकण्यासाठी प्रोत्साहित करण्याबद्दल हमी भरली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती तेजस्विनी देसले यांनी तर आभार प्रदर्शन चौधरी सर यांनी केले. ही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबू राठोड,मनीषा नगरकर,रश्मी होनमुटे, पूजा सोनवणे,प्रकाश इंगळे यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ डिसेंबर २०२४


## प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये आनंद मेळावा उत्साहात साजरा... विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**मुरूम, ता. उमरगा येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये बाल आनंद मेळावा साजरा करताना मान्यवर, शिक्षक, पालक विद्यार्थी आनंद लुटताना.**

**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये आनंद मेळावा शनिवारी (ता. 28) रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक सच्छिदानंद अंबर होते.

प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेचे पुजन मुख्याध्यापिका अनुराधा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परीक्षक मुख्याध्यापक करबसप्पा ब्याळे, प्रा. शोभा पटवारी, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, धनराज हळळे, संगमेश्वर लामजने, विरेंद्र लोखंडे, सुभाष धुमाळ, पंकज पाताळे, सागर मंडले, जगदीश सुरवसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सच्छिदानंद अंबर यांनी मनोगत व्यक्त केले. आनंद मेळाव्याचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार जगदीश सुरवसे यांनी मानले.विद्यार्थ्यांना कमवा व शिका याची जाणीव, विविध व्यवसाय व व्यवहाराची माहिती व्हावी, यासाठी हा बाल आनंद मेळावा घेण्यात आला. आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, भेळ, पालेभाज्या, गुलाब जामुन, आप्पे, कचोरी, वडापाव, इडली, मसाला पापड, भजे, पॅटिस आदी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. या आनंद मेळाव्यात विविध प्रकारच्या पाककला तयार करून महिलांनी आनंद मेळाव्यात सहभाग नोंदवला.

सहशिक्षिका संगीता देशमुख, नेहा माने, शितल घोडक, सरस्वती समन, तनुजा जमादार, प्रभावती कलशेट्टी, साधना शेवाळकर, गीता सत्रे, सरस्वती जाधव, सरोजा सारणे, अश्विनी क्षीरसागर, सोनाली कारभारी, सुधाराणी शेळके, श्रीदेवी मंडले, पुजा मरबे आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या आनंद मेळाव्यास विद्यार्थी, पालक बहुसंख्येने सहभागी झाले होते.

## रहाळपट्टी तांडा येथे डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (डॉ. प्रतिभा धोंडकर) :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय विशेष शिबीर रहाळपट्टी तांडा छत्रपती संभाजीनगर येथे दि. ३१ डिसेंबर ते ६ जानेवारी या कालावधीत घेण्यात येणार आहे.

'युथ फॉर माय भारत' या विषया अंतर्गत संविधानाचे महत्त्व, बालविवाह प्रतिबंध उपाय , व्यक्तिमत्त्व विकास, युवकांचे मानसिक स्वास्थ्य आणि तंत्रज्ञान, एड्स जनजागृती, तंत्रज्ञान आणि आर्थिक सुरक्षा, कौशल्य विकास तसेच कीर्तनातून प्रबोधन अशा विविध विषयांवर विद्यार्थिनींना तसेच ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दि. ३१ डिसेंबर रोजी शिबिराचे उद्घाटक म्हणून मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष ॲड. डॉ. कल्पलता पाटील-भारस्वाडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोनाली क्षीरसागर, विशेष अतिथी रहाळपट्टी तांड्याच्या सरपंच श्रीमती छायाताई राठोड या मान्यवरांची विशेष उपस्थिती असेल.

या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल यांच्या संयोजनाने या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## गौतम बुद्धांचा धम्म म्हणजे माणसाच्या सुखाचा शोध : सुकुमार कांबळे




**कन्नड (अरुण थोरात):** गौतम बुद्धांनी सर्वात प्रथम जातीव्यवस्था मोडीत काढली. पाण्यासाठी माणसाने माणसाची डोकी फोडावी, हे मान्य नसल्याने त्यांनी राजगादीचा त्याग केला आणि सुखाच्या शोधात निघाले. त्यातून त्यांना धम्माचा शोध लागला.

गौतम बुद्धांचा धम्म म्हणजे माणसाच्या सुखाचा शोध होय, असे प्रतिपादन सांगली येथील जेष्ठ आंबेडकरी विचारवंत सुकुमार कांबळे यांनी केले. ते दि. ३० डिसेंबर रोजी स्वातंत्र्यसेनानी दलितमित्र भाऊसाहेब मोरे प्रतिष्ठान, जयभीम मित्र मंडळ आणि महिला मंडळाच्या वतीने, कन्नड शहराजवळील मक्रणपुर येथे आयोजित ८६ व्या,' जयभीम दिन व मक्रणपुर परिषदेचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.

या वेळी पोलिस अधिक्षक ( ग्रामीण) डॉ. विनय राठोड, जेष्ठ पत्रकार स. सो खंडाळकर,भन्ते ग्यानरक्षित महाथेरो, जेष्ठ समाजसेविका चंद्रसेनाताई शेजवळ, तहसिलदार विद्याचरण कडवकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रघुनाथ सानप, सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी, वरिष्ठ पत्रकार मुख्तार खासाब, जिल्हा मुद्रांक नोंदणी अधिकारी जी.बी. सातदिवे यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना सुकुमार कांबळे म्हणाले की, आजच्या तरुणांना आंबेडकरी विचारांचे महत्व वाटत नाही. मात्र जयभीम आपला श्वास आहे आणि तो सर्वांनी जपला पाहिजे. कारण सांस्कृतिक दहशतवाद अजून संपलेला नाही. जात हे विष आहे आणि आपण आजही जातीत अडकलो आहोत. जातीभेद संपल्याशिवाय समता प्रस्थापित होणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. या परिषदेचे प्रास्ताविक करतांना संयोजक प्रविण मोरे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विषद केली.

या वेळी स.सो. खंडाळकर, सत्कारमुर्ती चंद्रसेनाताई शेजवळ, पोलिस अधिक्षक डॉ. विनय राठोड यांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमाची सुरुवात भिक्खू संघ, बौद्धचार्य आणि मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या नंतर बौद्धवंदना घेण्यात येऊन मुख्य कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनाधिकारी मनोज कांबळे, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा कीर्तीताई मोरे, निलिमाताई उबाळे, अभय उबाळे, गोपीचंद थोरात, राहुल बोदाडे, कारभारी त्रिभुवन, अथर्व मोरे, स्वप्निल बोराडे यांच्यासह स्वातंत्र्यसेनानी दलितमित्र भाऊसाहेब मोरे प्रतिष्ठान, जयभीम मित्र मंडळ आणि महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

विदर्भातील ख्यातनाम कवी अजीम नवाज राही यांनी आपल्या खास शायराना शैलीत, बहारदार सूत्रसंचालन केले. राही यांच्या सूत्रसंचालनाने उपस्थित तृप्त होऊन गेले. शेवटी खुलताबाद येथील वनाधिकारी मनोज कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रसिध्द प्रबोधक राहुल अन्विकर व पंचशीला भालेराव यांच्या, भिमगितांच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाने या परिषदेची सांगता करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३१ डिसेंबर २०२४

## संभाजी सेनेचे जिल्हाप्रमुख लक्ष्मण मोटे पाटील यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षात जाहीर प्रवेश -





**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक २९ डिसेंबर रविवार रोजी शासकीय सुभेदारी विश्रामगृह औरंगाबाद येथे झालेली रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाची महत्त्वाच्या बैठकीत पक्ष प्रमुख राजूभाई साबळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून संभाजी सेनेचे जिल्हाप्रमुख लक्ष्मण मोटे पाटील तसेच आंबेडकरी चळवळीतील प्रकाश घोरपडे गौतम सोनवणे यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रसंगी राजू भाई साबळे यांनी सांगितले की आर पि एम पक्ष सर्व जाती धर्मांच्या घटकांना सोबत घेवून चालणारा संविधानवादी पक्ष असून शेवटच्या घटकांपर्यंत शिव फुले शाहू आंबेडकरी यांची विचारधारा सर्वसमावेशक व व्यापक स्वरूपाचे कार्य करणार असून राज्यात मोठे संघटन आपण उभे करणार आहोत या वेळी साबळे सांगत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अँड.अविनाश थिट्टे महाराष्ट्र राज्य सचिव सुरेश शिनगारे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष सुनिल कोतकर चित्रपट आघाडीच्या राज्य सचिव दिग्दर्शक दिपक म्हस्के मराठवाडा उपाध्यक्ष सुनिल खरात मराठवाडा कार्याध्यक्ष साहेबराव जाधव शहर अध्यक्ष रंजीत मनोरे युवा शहर अध्यक्ष अर्शद लखपती पश्चिम शहर अध्यक्ष स्वप्निल खंडागळे मध्य शहरअध्यक्ष संतोष जाधव अमोल पगारे भिमराव गाडेकर हन्नू नाना विजय सदावर्ते अँड.युवराज जाधव अँड.विकास बनकर अँड.कैलाश पवार अँड.विकास सोनवणे सुधाकर साबळे शांतीलाल हिवराळे प्रकाश जमधडे विशाल गाडे विजय राऊत गणेश गौरये अमजद खान विनायक लव्हे विलास साळवे विकास कांबळे कलीम पटेल रफिक शेख राहुल कसबे सतीश शेजवळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.




# रोजनिशी

## (Dear Personal Diary)



**रुपाली कचरे**

rupalikachare२६@gmail. Com

+९१ ९५४५२ २०३८३

प्रिय रोजनिशी तू आहे म्हणून मी आहे की
मी आहे म्हणून तू आहेस?

तू कशी? मी जशी!
तू अशी अल्हाद वर्तमान जशी!

लिहावे काय तुझ्या परी?
की लिहावे तुला माझ्यावरी?

जे आहे तुझ्यात, तेच आहे माझ्यात..
मग वाटे का भिन्न तू या जगात?

बदल तूझ्यात की माझ्यात?
न कळे या भवसागरात..!

तू तर निर्जीव आणि मी सजीव!
हा एकमेव फरक जाणू का आपल्यात?

तू शांत आणि मी अस्वस्थ
पण जेव्हा तू अस्वस्थ (गीचमीड) तेव्हा मी होते
शांत!

कसे म्हणू तुला भिन्न? तू तर माझेच अंतरंग!
माझा रंग एकच मग तू कशी रंगेबीरंग?
अट्टहास हा जाईना, तू वेगळी मी वेगळी
जमेचना..! आणि जमल्याशिवाय करमेचना..

तू कधी सकारात्मक कधी नकारात्मक अगदी
माझ्यापरी
तुझ्यात मी की माझ्यात तू?

शेवटी तुझ्याशिवाय जी उरते ती असते मी
शांत,स्थिर आणि सजीव !

तुला लिहून संपल्यावरच लागतो मला स्वत:चा
छडा..
मला सापडते तुझ्याशिवाय वेगळी मी पूर्ण संपूर्ण..